Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's

# Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur

Department of -MARATHI

A) A SUMMARY REPORT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) Title of Programme: | | **राष्ट्रीय वेबिनार**<br>विषय : 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक' | | |
| 2) Name of Organizing Department/Unit: | | मराठी | | |
| 3) Name of the Coordinator(s)/ Convener(s)/ Organizer(s) of the Programme: | | डॉ. संभाजी पाटील | | |
| 4) Date(s) of the Programme: | | मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२ | | |
| 5) Venue: | | ऑनलाईन कार्यक्रम ('गुगल मिट'ॲप ) | | |
| 6) Target Group: | | UG | | |
| 7) Number of Participants: | | Male | Female | Total |
| A separate list with signatures be maintained in the department/Unit) | Teaching | १० | ०२ | १२ |
| | Non-Teaching | ०१ | ०० | ०१ |
| | Students | २६ | ६५ | ९१ |
| | | **३७** | **६७** | **१०४** |
| 8) Name(s) and details of Resource Person(s), if any: | | १) **डॉ. भालचंद्र शिंदे**<br>( सेवानिवृत्त प्राध्यापक तथा अध्यक्ष, कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, गुलबर्गा )<br>**२) श्री. प्रभाकर ढगे**<br>( संपादक, गोवन वार्ता, पणजी, गोवा )<br>**3)** श्रीमती चित्रा क्षीरसागर<br>( मनसा क्रिएशन तथा साहित्यिक, पणजी, गोवा) | | |
| 9) Total Expenditure for the Programme: | | २५०० /- रु | | |
| 10) Source of Funding: | | राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर | | |

B) A Report

i. Title : **'बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक'**

ii. Introduction :

२७ सप्टेंबर२०२२ रोजी महाविद्यालयातील मराठी विभागाने 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक' या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. 'हैद्राबाद व कर्नाटक प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक' व 'गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक' या दोन सत्रांमध्ये हे वेबिनार यशस्वीपणे संपन्न झाले. या वेबिनारसाठी पहिल्या सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते, तर प्रमुख पाहुणे डॉ. भालचंद्र शिंदे होते. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे होते. तर प्रमुख पाहुणे श्री. प्रभाकर ढगे आणि श्रीमती चित्र क्षीरसागर, पणजी, गोवा येथून उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख उपस्थिती डॉ. अभिजीत यादव यांची होती. मराठी विभागातील ०४ प्राध्यापक, बाहेरील महाविद्यालयातील ०८ प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी १ व ९१ विद्यार्थी उपस्थिती होते.

iii. Objectives of the Programme:

1. बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिकांची ओळख करून घेणे.
2. हैद्राबाद व कर्नाटक प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिकांची माहिती घेणे.
3. गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिकांची माहिती घेणे.
4. महाराष्ट्राबाहेरील आधुनिक मराठी साहित्य समजून घेणे.

iv. Details of Participants : बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम – मराठी द्वितीय व ऐच्छिक भाषा -मराठी विषयाचे २६ मुले +६५ मुली असे एकूण ९१ विद्यार्थी, ४ प्राध्यापक,०१ शिक्षकेतर कर्मचारी, बाहेरील महाविद्यालयातील ०८ प्राध्यापक आदींची उपस्थिती होती.

v. Brief Summary of Events

२७ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील मराठी विभागाने 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक' या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. 'हैद्राबाद व कर्नाटक प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक', 'गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक' या दोन सत्रांमध्ये वेबिनार संपन्न झाला. या राष्ट्रीय वेबिनारसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे प्रथम सत्राचे अध्यक्ष होते तर साधन व्यक्ती डॉ. भालचंद्र शिंदे सेवानिवृत्त प्राध्यापक तथा अध्यक्ष, कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, गुलबर्गा, द्वितीय सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे तर साधन व्यक्ती म्हणून साधन व्यक्ती श्री. प्रभाकर ढगे संपादक गोवन वार्ता, पणजी, गोवा दुसरे साधन व्यक्ती श्रीमती चित्रा क्षीरसागर, मनसा क्रिएशन तथा साहित्यिक पणजी गोवा, प्रमुख उपस्थिती डॉ. अभिजीत यादव कार्यासन अधिकारी तथा समन्वयक, अं. गु. ह. कक्ष, राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त, लातूर यांची होती.

हैद्राबाद व कर्नाटक प्रदेशात देऊळगावकर, पुरंदरे, व्यंकटेश वळसंगकर, वंदना केळीकर ईत्यादी साहित्यिक सद्या चांगल्या प्रकारे साहित्य लेखन करतात. वचन साहित्य, अभंग साहित्य कर्नाटक प्रांतात खूप मोठ्याप्रमाणात लिखित झालेले आहे. कर्नाटक प्रांतातील साहित्याबरोबरच संस्कृतीची ओळख करून दिली व या साहित्याची चिकित्सा केली. वेळअमावस्या सन हा कर्नाटक प्रांतातून महाराष्ट्रात आल्याचे सांगितले. साहित्य आणि साहित्यिकांसोबतच समीक्षालेखकांची डॉ. प्रभाकर शिंदे यांनी माहिती करून दिली.

महाराष्ट्र हा मराठी भाषेचे भरणपोषण करतो आहे, तसेच महाराष्ट्राबाहेरही मराठी भाषेचे भरणपोषण होत आहे. मराठी भाषेत प्रादेशिक कथेची सुरूवात गोवा या प्रांतातून झाली आहे. गोवा प्रांतात धर्मोपदेशकांनी धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मराठी भाषेचा वापर केला गोवा प्रांतात विविध साप्ताहिक, मासिके मराठी भाषेतून प्रकाशित होतात. महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा वाढवणारे मराठी भाषिक माणसं वाढत आहेत. सांस्कृतिक संचित टिकवण्याचे काम महाराष्ट्रबाहेर अविरतपणे सुरू आहे. बृहन्महाराष्ट्रातील ताकद घेऊन दिल्लीत आवाज उठवला असता, तर मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला असता. असे विवेचन श्री. प्रभाकर ढगे यांनी केले.

गोवा प्रदेशातील मराठी संस्थांनी मराठी लेखक घडवण्याचे काम केले आहे. त्यात 'शारदा ग्रंथ मंडळ', 'गोमंतक साहित्य प्रतिष्ठान' अशा विविध संस्थांनी मराठी साहित्यिक घडवले आहे. त्यात गो. बा. ढवळीकर, राधा भावे, ॲड. नॉर्वेकर, विनय बापट, प्रभाकर ढगे, गुरूनाथ नार्वेकर, पौर्णिमा केळकर या साहित्यिकांनी मराठी भाषेत खूप मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. गोव्याला मराठी नाटकाची परंपरा आहे व ती जपण्याचे काम मराठी माणूस करतो आहे. आम्ही सर्व मराठीच्या पालखीचे भोई म्हणून काम करतो आहोत; पण साहित्य अकादमीचा पुस्कार गोव्यातील साहित्यिकांना मिळत नाही, ही खंत श्रीमती चित्रा क्षीरसागर यांनी 'गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक'या विषयावर बोलताना व्यक्त केली. यावेळी मराठी विभागातील ०४ प्राध्यापक ९१ विद्यार्थी आणि इतर महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती होती.

vi. Conclusion, with Feedback on the Programme

ब्रहनमहाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक यांचा बोध विद्यार्थ्यांना झाला.


vii. Any Appendix If Necessary: 'गुगल मिट' ॲपवरील उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

HoD
मराठी विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),
लातूर ४१३ ५१२

RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) ★LATUR★

Principal
PRINCIPAL
Rajarshi Shahu.Mahavidyalaya
(Autonomous), Latur

C) Geotagged Photographs –




‘हैद्राबाद व कर्नाटक प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक’ या विषयावर बोलताना डॉ. भालचंद्र शिंदे





‘गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक’ या विषयावर बोलताना श्री. प्रभाकर ढगे





‘गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक’ या विषयावर बोलताना श्रीमती चित्रा क्षिरसागर





अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य बोलताना डॉ. महादेव गव्हाणे





‘गुगल मिट ॲप’ वर उपस्थित मान्यवर व  मराठी विषयाचे विद्यार्थी




‘गुगल मिट ॲप’ वर उपस्थित मान्यवर व  मराठी विषयाचे विद्यार्थी




‘गुगल मिट ॲप’ वर उपस्थित मराठी विषयाचे विद्यार्थी




‘बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक’ या विषयावरील श्रोत्यांचे अभिप्राय




मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी वेबिनारचे थेट प्रक्षेपण प्रोजेक्टरच्या माध्यमातून करण्यात आले.

D) Link of Video of the programme if any (Video may be uploaded on college website/ YouTube, etc.)

E) Copies of Brochure Prepared for the Programme : कार्यक्रमाचा डिजिटल फलक

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**मराठी विभाग आयोजित**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त

राष्ट्रीय वेबिनार

**विषय: बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य व साहित्यिक**

॥ मंगळवार, दिनांक: २७ सप्टेंबर २०२२, वेळ दुपारी १२.००वा., ॥

**विषय: हैद्राबाद व कर्नाटक प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक**

अध्यक्ष: प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

प्रमुख पाहुणे: डॉ भालचंद्र शिंदे

(सेवानिवृत्त प्राध्यापक तथा अध्यक्ष, कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, गुलबर्गा)

: प्रा. विजयकुमार चौधरी

(सदस्य, कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, गुलबर्गा)

**विषय: गोवा प्रदेशातील मराठी साहित्य व साहित्यिक**

अध्यक्ष: उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे

प्रमुख पाहुणे: श्री. प्रभाकर ढगे

(संपादक, गोवन वार्ता, पणजी, गोवा)

श्रीमती चित्रा क्षीरसागर

(मनसा क्रिएशन तथा साहित्यिक, पणजी, गोवा)

प्रमुख उपस्थिती: डॉ. अभिजीत यादव

(कार्यासन अधिकारी तथा समन्वयक, अ. गु. ह. कक्ष)

संयोजन: मराठी विभाग ॥

डॉ. संभाजी पाटील, डॉ. गोविंद उफाडे, प्रा. बापूसाहेब जवळेकर, डॉ. शिवराज काचे, डॉ. विजयकुमार करजकर

ऑनलाईन सत्र: माध्यम- Google Meet

**To join the meeting on Google Meet, click this link:**

https://meet.google.com/qgb-gywi-wib

**Or open Meet and enter this code:** qgb-gywi-wib

F) Any Other Publicity Material (news reports, online publicity, etc) (hard and soft copies to be maintained by the department/ Unit).

HoD
मराठी विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),
लातूर ४१३ ५१२

RAJARSHI SHAHU MAHAVIDYALAYA (AUTONOMOUS) ★ LATUR ★

Principal
PRINCIPAL
Rajarshi Shahu.Mahavidyalaya
(Autonomous), Latur